## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ७७०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/११/२०१७

### १) विवाहीतेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १५/११/२०१७ चे २२.३३ वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही आपले घरी हजर असतांना यातील आरोपीने फिर्यादीचे मोबाईल नंबर वर आपले मोबाईल नंबर वरुन अश्लिल मॅसेज ईलेक्ट्रॉनीक माध्यमाव्द्रारे पाठवुन छुपा पाठलाग करुन लैगिंकता प्रक्षेपीत करण्याचा प्रयत्न केला व फिर्यादीचे पतीस फोन व्द्रारे धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३५४(ड)(२),५०९,५०७ भा.दं.वी. सहकलम ६७(अ)मा.त.कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नी. चौहान पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

### २) मेडीकल स्टोर्स मधील पैश्याची चोरी .:–

दिनांक १५/११/२०१७ चे २३.०० ते १६/११/२०१७ चे ०७.४० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी अरुण श्रावणजी डोकरीमारे वय ५० वर्ष, रा. मोहगाव देवी शिवा मेडीकल मेडीकल स्टोअर्स वरठीचे कोणीतरी अज्ञात चोराने शर्टरचा ताला तोडुन आत प्रवेश करुन १ नोट २०००/–रु, १००च्या २० नोटा, ५०च्या १५ नोटा, २० रु.च्या १० नोटा, १० रु. च्या १००नोटा, ५,२,१च्या रु च्या ८,०००/–रु. असा एकुण १३,९५०/–रु. चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४५७,३८० भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो. हवा. भोंदे पो.स्टे. वरठी हे क्रीत आहेत.

### ३) किराणा दुकानाचे पैसे व किराणा सामानाची चोरी .:–

दिनांक १५/११/२०१७ चे २१.०० ते १६/११/२०१७ चे ०७.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी योगेश्वर धुरवाजी बडवाईक वय ५० वर्ष, रा. सातोना यांचे जय बजरंग किराणा दुकानाचे शर्टरचे वरील भागाची सिमेंट खिडकी तोडुन कोणीतरी अज्ञात चोराने आत प्रवेश करुन कुणीही नसल्याची संधी साधुन १० रु च्या ३००नोटा, ५,२,१ रुपयांचे चिल्लर एकुण ५,०००/–रु. व किराणा सामान २०५०/–रु. असा एकुण १०,५००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४५७,३८० भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. भोंदे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

४) सोन्या चांदीचे दागीने व नगदी पैश्याची चोरी .:—

दिनांक १५/११/२०१७ चे २१.३० ते १६/११/२०१७ चे ०४.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी मुलचंद धोडु पारधी वय ५० वर्ष, रा. पाचगाव यांचे घराचा कोणीतरी अज्ञात चोराने मागील दाराची कडी कोंडा तोडुन आत प्रवेश करुन बेडरुम चे पेटी मधुन नगदी २०,०००/—रु. १ जोड चांदीच्या पायपट्या किंमती ७००/—रु. सोन्याचा टॉप्स वजन ३ ग्रॅम, किंमती ४,०००/—रु. १ ग्रॅम सोन्याचे मनी किंमती २,०००/—रु. तसेच फिर्यादीचे शेजारील राहणारे श्रीकृष्ण पटले, विश्वास शहारे, गुनीलाल पटले यांचे घरात ठेवलेल्या लाकडी कपाट, संदुक, लोखंडी आलमारी मधुन नगदी १२,५००/—रु. १ जोड पायपट्टया १४ तोळे किंमती १०००/—रु, १ जोडी चांदीचे जोडवे किंमती ३००/—रु. १ ग्रॅम, सोन्याचा खडा २,०००/—रु, चांदीच्या ३ पायपट्टया किंमती ३,०००/—रु. नाकातील ०.५ ग्रॅम, सोन्याची फुली किंमती १,०००/—रु. असा सर्व मिळुन एकुण ५२,५००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४५७,३८० भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास स.फौ. खोंडे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

५) मोटार पंपची चोरी :— .

दिनांक १५/११/२०१७ चे १९.०० ते १६/११/२०१७ चे १०.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी शालीकराम रामदास धावडे वय ५४ वर्ष, रा. राणी लक्ष्मी बाई वार्ड भंडारा याचे नवीन घराचे बांधकामावर बोरवेलला लावलेली १ एचपी ०.८ तेज कंपनीची सबमर्शिबल मोटार पंप व १५० फुट केबल वायर असा एकुण १५,०००/—रु चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. भुसावडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

६) शासकीय अनुदानाच्या योग्य वापर न करता खोटे प्रमाणके खर्ची केल्याने गुन्हा नोंद :— .

दिनांक ०८/०९/२०१५ ते ३१/०३/०१६ पर्यत. यातील आरोपीने शासकीय काममध्ये स्वत: उत्तमराव पाटील जैवविवीधता उद्यान डोंगरला येथे प्रत्यक्षात उदयान क्षेत्रात मिळालेल्या शासकीय अनुदानाच्या योग्य वापर न करता व काही कामे न करता खोटे प्रमाणके खर्ची केल्याने त्यांनी ७ लाख १ हजार ५२५ रुपये अपहार केल्याने फिर्यादी जाहीररुद्दीन तारेसाहेब पठाण वय ५७ वर्ष, रा. अंबीका नगर भोजापुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४२०,४६८,४७१,४०९ भांदवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास स.पो.नि. म्हैसकर पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

७) अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी . :–

दिनांक १६/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, करडी, तुमसर, गोबरवाही, साकोली, लाखणी, लाखांदुर, भंडारा व अडयाळ येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण १० गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३७ लिटर हातभट्टी दारू किंमती ३१५०/–रूपया चा १२ लिटर ९६० मिली लिटर देशी + १ मोटार सायकल किंमती १३६४८/–रु. तसेच जुगारातुन किंमती ८७०/–रु असा एकुण किंमती १७,६६८/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

(एम.एम. सिडाम)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.